तक्रारदाराचा सरतपास शपथेवर अधिवक्ता श्री.एम.एच. रहांगडाले यांच्याद्वारे –

१. मी माझे पुराव्याचे शपथपत्र दिनांक १७.०७.२०२३ रोजी न्यायालयात सादर केले आहे. आता मला सदरचे शपथपत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर शपथपत्र नि.क्र. १७ वर आहे. नि.क्र. १९ वरील यादीमध्ये अनुक्रमांक ६ वर सतिश चौधरीने मला दिलेला चेक बँकेत टाकल्याबद्दलची मुळ पावती दाखल केली आहे. आता मला सदरची पावती दाखविण्यात आली. ती तिच असुन त्यावर बँकेच्या अधिका–याची सही व शिक्का आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशानी क्रमांक २१** देण्यात येत आहे.

२. नि.क्र. १९ वरील यादीमध्ये अनुक्रमांक ५ वर सदरचे चेक न वटना परत आल्याबद्दलचे रिर्टन मेमोची मुळ प्रत दाखल केली आहे. आता मला सदरची प्रत दाखविण्यात आली. ती तिच असुन त्यावर शाखा प्रबंधक, बँक ऑफ इंडीया यांची सही व शिक्का आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशानी क्रमांक २२** देण्यात येत आहे.

३. नि.क्र. १९ वरील यादीमध्ये अनुक्रमांक ४ वर आरोपीने मला दिलेल्या चेकची मुळ प्रत दाखल केली आहे. आता मला सदरची प्रत दाखविण्यात आली. ती तिच असुन त्यावर आरोपीची सही आहे. त्याने माझ्यासमक्ष सही केल्यामुळे मी त्याची सही ओळखतो. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशानी क्रमांक २३** देण्यात येत आहे.

४. नि.क्र. १९ वरील यादीमध्ये अनुक्रमांक ७ वर माझ्या व आरोपीमध्ये झालेल्या करारनाम्याची मुळ प्रत दाखल केली आहे. आता मला सदरची प्रत दाखविण्यात आली. ती तिच असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर लिहुन देणार म्हणुन आरोपीची सही आहे व लिहुन घेणार म्हणुन माझी सही आहे तसेच दोन साक्षीदारांच्या सहया आहेत. त्यांनी माझ्यासमक्ष सहया केल्यामुळे मी त्यांच्या सहया ओळखतो. सदर करारनाम्याला **निशानी क्रमांक २४** देण्यात येत आहे.

५. नि.क्र. १९ वरील यादीमध्ये अनुक्रमांक २ वर आरोपीला माझ्या वकिलांमार्फत पाठविलेल्या नोटीसची कार्यालयीन प्रत दाखल केली आहे. आता मला सदरची प्रत दाखविण्यात आली. ती तिच असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझ्या वकिलांची सही आहे. त्यास **निशानी क्रमांक २५** देण्यात येत आहे.

६. नि.क्र. १९ वरील अनुक्रमांक १ वर सदरची नोटीस आरोपीला पाठविल्याबद्दलची मुळ पोस्टाची पावती दाखल केली आहे. आता मला सदरची पावती दाखविण्यात आली. ती असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशानी क्रमांक २६** देण्यात येत आहे.

७. नि.क्र. १९ वरील अनुक्रमांक ३ वर सदरची नोटीस आरोपीने घेण्यास नकार दिल्यामुळे मला परत आल्याने मी मुळ नोटीस लिफाफयासह आणि स्वीकृतीपावतीसह दाखल केला आहे. आता मला सदर नोटीस असलेला लिफाफा स्वीकृतीपावतीसह दाखविण्यात आला. तो तोच असुन त्यास स्वीकृतीपावतीसह **निशानी क्रमांक २७** देण्यात येत आहे.

८. (नि.क्र. २७ वरील लिफाफा कोर्टाच्या परवानगीने उघडण्यात आला व त्यात असलेली नोटीस साक्षीदाराला काढुन दाखविण्यात आली). आता मला नि.क्र.२७ वरील लिफाफयात असलेली नोटीस दाखविण्यात आली. ती तिच असुन त्यावर माझ्या वकिलांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशानी क्रमांक २८** देण्यात येत आहे.

**आरोपीचे वकिलांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

मौदा.

दिनांक १८.०६.२०२४

(ए.बी. कादियन )

न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी मौदा